स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 305.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./माजं/प्रेस/23/24
दिनांक : 26/02/2024

## प्रेस नोट

वसई विरार शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ सेवा हमी कायदा अंतर्गत वसई विरार क्षेत्रातील नागरिकांसाठी एकूण ५१ सेवा अधिसूचित केलेल्या आहेत. या सर्व सेवांचा नागरिकांना लवकरात लवकर सोईस्कररीत्या लाभ मिळणेकामी RTS (सेवा हमी कायदा) (Right to Service) संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.

सदर सेवांचा ऑनलाईन पद्धतीने लाभ घेणेकरिता https://rtsvvmc.in/vvcmcrts/ या प्रणालीवर भेट देऊन नागरिक स्वतःचा स्वतंत्र Login ID तयार करून ५१ सेवांपैकी हव्या असलेल्या सेवे करिता ऑनलाईन अर्ज दाखल करू शकतात, नागरिकांना सदर अर्ज शुल्क भरणा करणे करिता Payment Getway सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच सदर ५१ सेवांपैकी मालमत्ता करांच्या सेवांसाठी ऑनलाईन पेमेंट करताना लागणारा अतिरिक्त शुल्क वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे सहजरित्या अर्ज दाखल करता येणार आहे. अर्ज दाखल केल्यानंतर नोंदणी क्रमांक (Unique Number) व पावती, त्वरित प्राप्त होईल त्या द्वारे नागरिक आपल्या अर्जाची सद्यस्थिती पाहू शकतात. नागरिकांना सदर सेवेचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होणार आहे. तसेच सदर RTS पोर्टल हे आपले सरकार पोर्टल सोबत Integration करण्यात आले असून सदर सेवांचा आपले सरकार पोर्टल वरुन देखील लाभ घेता येऊ शकतो.

तरी खालील नमुद केलेल्या सेवांचे शुल्कांचे पेमेंट ऑनलाईन करावयाचे असून सदर सेवांचा लाभ आपण आपले सरकार पोर्टल वरुन घेत असल्यास आपले सरकार पोर्टलचे शुल्क लागू असतील तर ते देखील शुल्क आपणांस ऑनलाईन पेमेंटद्वारे करावे लागतील.

वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५अंतर्गत ऑनलाईन देण्यात येणाऱ्या सेवा खालील प्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | विभागाचे नाव | सेवांची नावे | नियत कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य विभाग | जन्म प्रमाणपत्र देणे | ३ दिवस |
| २ | | मृत्यु प्रमाणपत्र देणे | ३दिवस |
| ३ | | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | ३६ कामकाजाचे दिवस |
| ४ | पाणी पुरवठा विभाग | नविन नळजोडणी | १५ दिवस |
| ५ | | मालकी हक्कात बदल करणे | ७ दिवस |
| ६ | | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे | १५ दिवस |
| ७ | | तात्पुरते / कायम स्वरुपी नळ जोडणी खंडीत करणे | ७ दिवस |
| ८ | | पुन:जोडणी करणे | १५ दिवस |
| ९ | | वापरामध्ये बदल करणे | १५ दिवस |
| १० | | पाणी देयक तयार करणे | ३ दिवस |
| ११ | | प्लंबर परवाना | १५ दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | १५ दिवस |
| १३ | | थकबाकी नसल्याचा दाखला | ३ दिवस |
| १४ | | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | ७ दिवस |
| १५ | | अनधिकृत नळ जोडणी तक्रार | ७ दिवस |
| १६ | | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | ३ दिवस |
| १७ | | पाण्याची गुणवत्ता तक्रार | ३ दिवस |
| १८ | | पाणी उपसा करणेसाठी भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | ३०दिवस |
| १९ | | जलनि:सारण जोडणी देणे | १५ दिवस |
| २० | घरपट्टी विभाग | नव्याने मालमत्ता कर नोंदणी | १५ दिवस |
| २१ | | पुन:कर आकारणी | १५ दिवस |
| २२ | | कराची मागणी पत्र तयार करणे | ३ दिवस |
| २३ | | कर माफी मागणे | ७ दिवस |
| २४ | | रहिवासी नसलेल्या मालमत्ताना करात सूट मिळणे | १५ दिवस |
| २५ | | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे / इतर मार्गाने | १५ दिवस |
| २६ | | स्वयंमुल्यांकन | १५ दिवस |
| २७ | | आक्षेप नोंदविणे | १५ दिवस |
| २८ | | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन | १५ दिवस |
| २९ | | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी कर आकारणी | १५ दिवस |
| ३० | | मालमत्ता कर उतारा देणे | ३ दिवस |
| ३१ | | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | ३ दिवस |
| ३२ | | दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १५ दिवस |
| ३३ | | वारसा हक्क नोंदणी | १५ दिवस |
| ३४ | अग्निशमन विभाग | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे | ७ दिवस |
| ३५ | | अग्निशमन अंतिम ना हरकत दाखला देणे | १५ दिवस |
| ३६ | ना हरकत दाखला | पंडाल साठी एन.ओ.सी | ७ दिवस |
| ३७ | | व्यापर /व्यवसाय साठा करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र | ७ दिवस |
| ३८ | नगररचना विभाग | झोन दाखला देणे | ७दिवस |
| ३९ | | भाग नकाशा देणे | ३दिवस |
| ४० | रस्ते खोदणे परवानगी | रस्ता खोदाई परवानगी देणे<br>नवीन परवाना व नुतनीकरण | ३० दिवस |

सेवा हमी कायदा अंतर्गत एकुण ५१ सेवा अंतर्भुत केलेल्या आहेत. तरी या सर्व ऑनलाईन सेवांचा नागरिकांना लवकरात लवकर सोईस्कररीत्या लाभ मिळणेकामी RTS (सेवा हमी कायदा) संगणक प्रणाली विकसित केल्यास या प्रणालीद्वारे नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने आपले अर्ज नोंदविताना मदत होईल तसेच त्या अर्जाचा मागोवा घेणे यासाठी कागदपत्र ऑनलाईन सादर करणे इत्यादी माहिती प्राप्त होईल. ह्या प्रणालीद्वारे नागरिकांना प्रमाणपत्रासाठी लागणारा कालावधी तसेच नियुक्त अधिका-यांची माहिती मिळेल, या प्रणालीद्वारे पालिका ऑनलाईन अर्ज मान्य किंवा अमान्य करु शकतील. नागरिक सहजरित्या आपल्या अर्जाचा पाठपुरावा (track) घेऊ शकतात. तरी सदर सेवांचे प्रमाणपत्र नागरीकांना ऑनलाईन उपलब्ध होणार आहे जेणेकरुन नागरीकांना महापालिकेमध्ये वारंवार फेऱ्या घालाव्या लागणार नाहीत.

(समीर भुमकर)
उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका